अस्सल सोलापुरी
सुराज्य
सोलापूर
epaper.surajyadigital.com
07 Aug 2024 - Page 6

# विद्यापीठात क्विक हिल सायबर क्लबचे उद्‌घाटन

सोलापूर/प्रतिनिधी

सोलापूर विद्यापीठातील संगणकशास्त्र संकुल व क्विक हिल फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा हा उपक्रम राबविला जातो. या अंतर्गत विद्यापीठात सायबर क्लबचे उदघाटन विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. प्रकाश महानवर यांच्या अध्यक्षतेखाली व क्विक हिल फाऊंडेशनच्या प्रमुख अनुपमा काटकर यांच्या उपस्थितीत उपस्थितीत करण्यात आले.

या उपक्रमाव्दारे समाजातील विविध घटकामध्ये सायबर गुन्हेविषयी माहिती दिली जाते. तसेच अशा प्रकारचे गुन्हे टाळण्यासाठी विविध उपाययोजना सेमीनारव्दारे सांगितले जाते. क्विक हिल फाऊंडेशनने या वर्षी हा उपक्रम राबविण्यासाठी संकुलातील ३० विद्यार्थ्यांची सायबर वॉरीयर्स म्हणून निवड केली आहे. तसेच ४ विद्यार्थ्यांची सायबर क्लब ऑफिसर्स म्हणून निवड केली आहे. आजच्या डिजीटल युगात समाजामध्ये सायबर सुरक्षेविषयी जागरूकता निर्माण करणे हि काळाची गरज आहे व त्यासाठी विद्यापीठातील सायबर वॉरीयर्स प्रयत्न करतील असे कुलगुरू प्रा.महानवर यांनी भाषणात सांगितले.




**सोलापूर : क्विक हिल सायबर क्लबच्या उदघाटनप्रसंगी प्रा. प्रकाश महानवर, अनुपमा काटकर व इतर मान्यवर.**

या उपक्रमाव्दारे सायबर वॉरीयर्समध्ये व्यक्तीमत्वाचा विकास व संभाषण कौशल्यमध्ये सुधारणा होऊ शकते, असे मत क्विक हिल फाऊंडेशनचे अजय शिर्के यांनी मांडले. काटकर यांनी क्विक हिल या अँटी व्हायरस कंपनीची माहिती दिली. प्रा. व्हि.बी. घुटे यांनी प्रास्ताविक व स्वागत केले.